# मोटर सायकल चोरी करणारा चोरटा पो.स्टे. हिंगणघाट येथील गुन्हे प्रकटीकरण पथकाचे जाळ्यात

दिनांक १६.०२.२०२१ चे संध्याकाळी ०७.०० वा. कोणीतरी अज्ञात चोरट्याने रुबा चौक, हिंगणघाट येथील मोबाईल दुकाना समोरुन फिर्यादी नामे संकेत तानबाजी मुन रा. भिमनगर वार्ड, हिंगणघाट यांची एक हिरो कंपनीची सुपर स्प्लेंडर काळ्या रंगाची मोटर सायकल क्रमांक एम.एच.-३२/एक्स-६४२० कि. २५,००० रु. चोरुन नेली. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पो.स्टे. हिंगणघाट येथे अप.क्र. १६०/२०२१ कलम ३७९ भादवि प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्ह्याचे चोरीचे अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण पथक तपास करीत असतांना मुखबीर कडुन प्राप्त माहीतीवरुन आरोपी नामे सुशिल दिलीपराव पाटील, वय ३० वर्ष, रा. शेगावं (कुंड), ह.मु. मिलींद सोसायटी, हिंगणघाट यास अटक करण्यात आली. सदर आरोपीचे ताब्यातुन गुन्ह्यातील चोरीस गेलेली एक हिरो कंपनीची सुपर स्प्लेंडर काळ्या रंगाची मोटर सायकल क्रमांक एम.एच.-३२/एक्स-६४२० कि. २५,००० रु. ची जप्त करुन मोटर सायकल चोरीचा गुन्हा उघडकिस आणण्यात आला.

सदरची कारवाई मा. पोलीस अधिक्षक श्री. प्रशांत होळकर, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. यशवंत सोळंके, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी हिंगणघाट श्री. दिनेश कदम, यांचे मार्गदर्शनात मा. पोनि. श्री. संपत चव्हाण, पो.स्टे. हिंगणघाट यांचे निर्देशाप्रमाणे पोलीस अंमलदार पो.हवा. शेखर डोंगरे, नापोशि. निलेश तेलरांधे, पंकज घोडे, विशाल बंगाले, पो.शि. सचिन भारशंकर, सुहास चांदोरे यांनी केली आहे.